यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी
(महाराष्ट्र शासनाची अंगीकृत संस्था)
RIGHT TO INFORMATION
Yashwantrao Chavan Academy of Development Administration
(A Government of Maharashtra Organisation)
ISO 9001:2008

# * आवाहन *

**विषय:- माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत जनजागृती कार्यक्रम करण्याबाबत...**

माहितीचा अधिकार कायद्याची अंमलबजावणी दि. १२ ऑक्टोबर २००५ पासून सुरु झाली. या कायद्या बाबत व्यापक जन जागृती व्हावी, शासन व्यवस्थेत माहितगार नागरिकांचा सहभाग वाढावा तसेच पारदर्शकता व उत्तरदायित्वाची प्रक्रिया सुरु व्हावी यासाठी केंद्र शासनाने विविध उपक्रम राबविलेले आहेत.

भारत सरकारच्या कार्मिक व प्रशिक्षण विभाग (DoPT) अनुदानीत सेंट्रल प्लॅन स्किम २०१६-१७ अंतर्गत माहितीचा अधिकार केंद्र, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा), माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ या विषयावर **जनजागृती कार्यक्रम** करणार आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून अमरावती विभागातील अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा व वाशिम या पाच जिल्हयांमध्ये **आर टि आय क्लिनीक** आणि नागपूर विभागातील गोंदिया, चंद्रपुर, वर्धा, भंडारा व गडचिरोली या पाच जिल्हयात **माहिती अधिकार अधिनियम, २००५ बाबत जनजागरण, पथ नाटय** असे कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. सदरचा माहितीचा अधिकार जनजागरण कार्यक्रम **२० जानेवारी रोजी सुरू होऊन १० फेब्रुवारी, २०१७** रोजी समाप्त होईल.

या प्रकल्पांतर्गत **अमरावती व नागपुर विभागात कार्यरत असलेल्या** स्वयंसेवी संस्थांकडून सदर कार्यक्रम राबविणेसाठी अर्ज मागविणेत येत आहेत. **अर्ज करण्याची अंतीम मुदत ही दि. ५ जानेवारी, २०१७ पर्यंत ठेवण्यात आलेली होती. या मुदतीत दि. १० जानेवारी, २०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत असून** इच्छूक स्वयंसेवी संस्थांनी अर्ज करावेत. यामध्ये **माहितीच्या अधिकारावर आधारीत पथनाटय** सादर करणे व **माहितीच्या अधिकाराचे मार्गदर्शन केंद्र** (RTI क्लिनिक) चालविण्याची जबाबदारी संस्थेवर सोपविण्यात येईल. सदर कार्यक्रम राबविण्यासाठी अटि व शर्ती पुढील प्रमाणे आहेत.

**अटी व शर्ती:-**

- ✓ **स्वंयसेवी संस्था नोंदणीकृत असावी.**
- ✓ **संस्था नोंदणी प्रमाणपत्र व इतर आवश्यक कागदपत्रे असावेत.**
- ✓ **मागील तीन वर्षाचे कार्यक्रम वार्षिक अहवाल व आर्थिक लेखे परिपुर्ण असावेत.**
- ✓ **मागील तीन वर्षाचे ऑडीट पुर्ण झालेले असणे व संस्थेचे कामकाज सर्वसाधारणपणे समाधानकारक असणे आवश्यक आहे.**
- ✓ **माहिती अधिकार अधिनियम,२००५ या अनुषंगीक जिल्हयात कार्यक्रम घेण्याचा पुर्व अनुभव असल्यास प्राधान्य**
- सदर पथनाटय व जनजागरण कार्यक्रमासाठी स्वयंसेवी संस्थांकडून प्राप्त झाल्यानंतर अर्ज छाननी प्रक्रियेअंती निवड झालेल्या संस्थेस प्रति दिवस रु.२७००/- प्रमाणे पाच दिवसाठी रु.१३,५००/- व चार दिवस मार्गदर्शन केंद्र चालविण्यासाठी व नागरीकांची एक कार्यशाळा घेण्यासाठी प्रती दिन रु.३३७५/- प्रमाणे रु.१३,५००/- त्यामध्ये बॅनर, वाहन खर्च, प्रचार पत्रक व आपल्या सहका-यांचे मानधन यांच्या खर्चासाठी कार्यक्रम निधी RTGS व्दारे अदा करण्यात येईल.
- निवड करण्यात आलेल्या संस्थेस यशदासोबत सामजस्य करार (MOU) करणे बंधनकारक असेल.

**अधिक माहितीसाठी संपर्क :-**
**प्रकल्प अधिकारी,**
**माहिती अधिकार केंद्र,**
**यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनि, पुणे**
**दुरध्वनी क्र. – ०२०- २५६०८१३०**
**rti@yashada.org or varsha.kanikdale@yashada.org**